# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 01/02/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

### चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावरील मौजा मांढळ ते उदासा येथे दिनांक 31/01/2021 चे 11.15 वा. ते 14.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. निर्मला राजेश्वर गेडाम, वय 40 वर्ष, रा. उदासा ता उमरेड या मांडळ वरून उदासा येण्याकरीता उमरेड बसमध्ये बसून त्या उमरेडला आल्या. त्यानंतर फिर्यादी या उमरेड वरून त्यांच्या मोपेड गाडीवर बसुन उदासा येथे पोहोचल्या. फिर्यादी या उदासा येथे पोहोचून त्यांनी आपला पर्स बघितले असता पर्स चैनजवळ फाटलेले दिसले. त्यामध्ये पाहीले असता 4 तोळे चा मंगळसुत्र कि. अंदाजे 60,000/–रू. व नगदी 700/–रू. असा एकुण 60,700/– रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरूध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री जयसिंगपूरे 8551862741 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावर मौजा नागपुर अमरावती रोड चौदामैल शिवार रानीखेत फार्महाउस जवळ येथे दिनांक 30/01/2021 चे 20:00 वा. दरम्यान एमएच– 40/जी– 9861 क्रमांकाची सैनी ट्रॅव्हल्सचा चालक आरोपीने आपले ताब्यातील ट्रॅव्हल्स बस नागपुर कडुन अमरावती रोडने भरधाव वेगाने व निष्काळीजपणे चालवुन एमएच– 40/बीपी– 5063 क्रमांकाच्या मोटरसायकला चौदामैल समोर राणीखेत फार्महाउस जवळ मागुन धडक दिली. या अपघातात मोटारसायकल स्वार नामे– रोशन मोहनराव टोंगे, वय 42 वर्ष, रा. धामना नेरी याचा जागीच मृत्यु झाला. तर मागे बसलेला ईसम गंभीर जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर माणीकराव मते, वय 64 वर्ष रा वार्ड क्रं 07 झेंडा चौक वानाडोंगरी ता हिंगणा कज नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 427, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी खडसे हे करीत आहे.

फसवणुक

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 12 कि मी अंतरावरील मौजा मेंढला येथे दिनांक 23/07/2020 पासुन ते आज पावेतो आरोपी नामे– प्रशांत कुमार या नावाने असलेले फेसबुक खाते धारक याने फिर्यादी नामे– आकाश ज्ञानेश्वर सातपुते, वय 22 वर्ष रा. मेंढला ता. नरखेड यांचे कुंटुबियाचे नावे फेसबुक या सोशल मिडीयाचे माध्यमातुन ज्ञानेश्वर सातपुते हा जादुटोना करणारा माणुस असून त्याने काहि लोकांचे घर बरबाद करून त्यांचा सत्यानाश झाला पाहिजे अश्या अश्लील स्वरूपाच्या पोस्ट फिर्यादीच्या फेसबुकवर टाकलेल्या दिसल्या. फिर्यादीचे वडीलांचे मामा पांडुरंग रामाजी दोडके रा. मेंढला याच्या परीवारचे नावे पांडुरंग दोडके हा व त्याचा मुलगा धनराज दोडके याच्या पत्नीबद्दल वाईट शब्दात पोस्ट टाकुन तसेच त्याच्या कुटुंबाच्या व गावातील नातेवाईकांच्या नावाने फेसबुक या सोशल मिडीयाचे माध्यमातुन अश्लील व बदनामीकारक मजकुर पोस्ट करुन फिर्यादीच्या कुटुंबाची व नातेवाईकांची बदनामी आरोपी करीत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी विरुध्द कलम 67 माहिती तंत्रज्ञान अधि. सहकलम 3, 2 महाराष्ट्र अघोरी आणि इतर अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम 2013 अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. मंगेश काळे 8380887452 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर